RNI No. MAHBIL/2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष ७, अंक ७२(६)] शुक्रवार, जून ११, २०२१/ज्येष्ठ २१, शके १९४३ [पृष्ठे ३, किंमत : रुपये ९.००

असाधारण क्रमांक १७४

### प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले
(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

### गृह विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक ११ जून २०२१

### अधिसूचना

**महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम.**

क्रमांक एफएलआर ०५२१/प्र.क्र. ६५/राउशु-२.— ज्याअर्थी, मुंबई विदेशी मद्य नियम, १९५३ मध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी पुढील नियम तात्काळ अंमलात आणण्यात यावेत आणि म्हणून महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम (१९४९ चा मुंबई २५ वा ) मधील कलम १४३ च्या पोट-कलम (३) च्या परंतुकाद्वारे तरतूद केल्याप्रमाणे पूर्वप्रसिद्धिशिवाय हे नियम करण्यात यावेत, असे महाराष्ट्र शासनास वाटते;

त्याअर्थी, आता, महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम मधील कलम १४३ च्या पोट-कलम (२) च्या खंड (ख), (छ) आणि (ज१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि याबाबत महाराष्ट्र शासनास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन, याद्वारे मुंबई विदेशी मद्य नियम, १९५३ मध्ये पुढील नियम करीत आहे :-

१. या नियमांना नियम "मुंबई विदेशी मद्य नियम (दुसरी सुधारणा) नियम, २०२१" असे संबोधण्यात यावे.

२. मुंबई विदेशी मद्य नियम, १९५३ च्या नियम २५ मध्ये,----

(१) उप-नियम (२) मध्ये, खंड (अ) च्या ऐवजी खालील खंड समाविष्ट करण्यात यावा, जसे कीः---

"(अ) सत्तर चौरस मीटरपेक्षा जास्त क्षेत्रफळ असल्यास आणि जो जिल्हाधिकारी किंवा त्यांनी प्राधिकृत केलेला कोणताही अधिकारी यांच्या लेखी अभिप्रायानुसार, आवश्यक साठा करण्यास संबंधित जागा पुरेशी नाही असे वाटल्यास.

परंतु असे की, सदर खंडातील ७० चौरस मीटरची मर्यादा, विस्तारीकरण वगळता, सध्याच्या अस्तित्वातील जागेसाठी लागू होणार नाही."

(२) उप-नियम (४) मध्ये, खंड (ड), पोट कलम (४) नंतर खालील खंड समाविष्ट करण्यात येईल, जसे कीः ---

"(४-अ ) प्रस्तावित केलेल्या जागेचे क्षेत्रफळ सत्तर चौरस मीटरपेक्षा जास्त नसावे."

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**युवराज ब. अजेटराव,**
शासनाचे उप सचिव.

**HOME DEPARTMENT**

Madam Cama Road, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya, Mumbai 400 032
dated the 11th June 2021.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA PROHIBITION ACT.

No. FLR 0521/C.R. 65/EXC 2.—Whereas, the Government of Maharashtra is satisfied that the following rules further to amend the Bombay Foreign Liquor Rules, 1953 should be brought into force at once, and therefore the rule should be made without previous publication as provided by the proviso to sub-section (*3*) of section 143 of the Maharashtra Prohibition Act (XXV of 1949) ;

Now, therefore, in exercise of the powers conferred by clauses *(b), (g)* and *(h1)* of sub-section *(2)* of section 143 of the Maharashtra Prohibition Act and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra hereby makes the following rules further to amend the Bombay Foreign Liquor Rules, 1953, as follows namely :—

1. These rules may be called the Bombay Foreign Liquor (Second Amendment) Rules, 2021.

2. In rule 25 of the Bombay Foreign Liquor Rules, 1953,—

*(i)* in sub-rule *(2),* for clause (a) the following clause shall be substituted, namely :—

"*(a)* which shall exceed in area more than seventy square metres and which is, in the opinion of the Collector or the authorized officer by him in this behalf in writing is not adequate for storing the required stock:

Provided that, this clause shall not be applicable to the existing premises, except for expansion, subject to seventy square meters."

*(ii)* In sub-rule *(4),* in clause *(d),* after sub-clause *(iv),* the following clause shall be inserted, namely :—

"*(iv a)* that the area of proposed premises shall not exceed seventy square metres."

By order and in the name of the Governor of Maharashtra,

YUVRAJ B. AJETRAO,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.